**Newspaper: Naavakal**

**Article Date: 21st October 2018**

**Article regarding Garba-Bhondla**



# विविधतेत एकता असलेला पोदारचा भोंडला !

माटुंग्याच्या आर. ए. पोदार कॉलेजमध्ये नुकताच मराठी वाङमय मंडळाचा भोंडला आणि गुजराथी वाङमय? मंडळाचा गरबा असे दोन्ही नवरात्रीचे उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. पोदार कॉलेजमध्ये मोठ्या प्रमाणावर मराठी आणि गुजराथी विद्यार्थी तसेच शिक्षक आहेत. पण असं असलं तरी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी एकत्रितपणे साजरा केलेला गरबा - भोंडला असा कार्यक्रम दोन्ही संस्कृतींचा वारसा जपणारा असा होता. यंदाच्या कार्यक्रमात पोदारच्या विद्यार्थ्यांनी माटुंगा पोलीस स्टेशनमधील महिला पोलिस टीमला या उत्साहात सामावून घेतलं. माटुंगा महिला पोलिसांचा यावेळी कॉलेजकडून सन्मान करण्यात आला. दोन मंडळांनी वेगवेगळा इव्हेंट करण्यापेक्षा एकत्रितपणे साजरा करण्यात आलेल्या या वर्षीच्या नवरात्रीला वेगळं उत्साही रूप प्राप्त झाल्याचं मत पोदार टीमने व्यक्त केलं.